जिल्हाधिकारी यांना नगर परिषदा अध्यक्ष थेट निवडणूक नियमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने प्राधिकृत करणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र


क्रमांक.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.४० /का-६
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.


दिनांक : १८/१०/२०१६.

प्रति,
विभागीय आयुक्त ( सर्व ),
जिल्हाधिकारी (सर्व ).
(मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे
जिल्हा वगळून )

**विषय :-** जिल्हाधिकारी यांना नगर परिषदा अध्यक्ष थेट निवडणूक नियमांतर्गत राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने प्राधिकृत करणेबाबत.

महोदय,

राज्यातील नागरी क्षेत्रातील २१४ नगर परिषदा/नगरपंचायती यांच्या निवडणुका घेण्याकरिता प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. यामध्ये माहे डिसेंबर,२०१६ ते फेब्रुवारी,२०१७ या कालावधीत मुदती संपणा-या १९१ नगरपरिषदा व २ नवनिर्मित नगरपरिषदांचा समावेश आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे ) अध्यादेश सन २०१६ अन्वये नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे.

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ ( १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -४०) चे कलम ५१ अ-१ अ च्या पोटकलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपध्दती अशा निवडणुकीस,योग्य त्या फेरफेरांसह, लागू होईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा ( अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक )नियम २०१६ च्या नियम ७३ नुसार या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यांशी सुसंगत असतील असे नगरपरिषदांच्या अध्यक्ष पदांच्या थेट निवडणूक घेण्याबाबतीत स्वतंत्रपणे निर्देश देऊ शकतात.

या अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खाली नमूद केल्याप्रमाणे आदेश देत आहे,

## आदेश

सोबतच्या परिशिष्ट १ च्या रकाना २ मध्ये नमूद नियम आणि पोट नियम इत्यादि अंतर्गत कार्यवाही करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हयातील नगर परिषदांमधील अध्यक्षपदाच्या थेट निवडणूकीकरिता राज्य निवडणूक आयुक्त यांच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१ प्रधान सचिव नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२ संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई -४०० ०३२.

३ विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व),

४ जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)

५ मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)

६ मा. आयुक्त राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक

७ सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक

८ राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

९ निवड नस्ती कार्यासन क्रमांक ६

# परिशिष्ट १

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/नपा/२०१६/प्र.क्र. ३९/का-०६, दिनांक : १७ ऑक्टोबर,२०१६ सोबतचे परिशिष्ट )

| अ.क्र. | महाराष्ट्र नगरपरिषदा ( अध्यक्ष पदासाठी थेट निवडणूक ) नियम २०१६, मधील नियम क्रमांक | प्राधिकृत केलेले अधिकार. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | नियम ७(१);(२)(क),(ख) व (ग) ; (३) | राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे निवडणुकीच्या सर्व टप्प्यांबाबतचे आदेश विहित नमून्यामध्ये मध्ये प्रसिध्द करणे |
| २. | नियम ८(१)(२) व (३) | राष्ट्रीय किंवा राज्य दुखवटयाच्या मुदतीत राज्य निवडणूक आयोगाचे नियंत्रण व निदेशानुसार निवडणुका पुढे ढकलणे |
| ३. | नियम,९(१) व (२) | निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक |
| ४. | नियम,१५ | निवडणूक कामाकरिता नेमलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्या कामावरील नियंत्रण |
| ५. | नियम,२७ | मतदानापूर्वी उमेदवार मरण पावल्यास उमेदवाराच्या मृत्युचे प्रतिवृत्त कळल्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक प्रत्यादेशित केल्याचे जिल्हाधिकारी यांना कळविणे जिल्हाधिकारी यांनी याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठवून नविन निवडणूक कार्यक्रम प्राप्त करून घेणे. |
| ६. | नियम ३४ ( ग ) | मतदान केंद्रात व्यक्ती वा अधिकारी यांना प्रवेश देणे |
| ७. | नियम ५३( ३ ) | राज्य निवडणूक आयोगाकडून पुन्हा मतदान घेण्याचा दिवस वेळ व मतदान केंद्र निश्चित केल्यावर विहित पध्दतीने त्यास प्रसिध्दी देणे |
| ८. | नियम ५५(१)(क),(ख); (२)(क),(ख) व ३ | मतपेटया किंवा मतदान यंत्रे नष्ट होणे इत्यादी बाबतीत नव्याने मतदान घेणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करणे |
| ९. | नियम ५७( १ ) (ख ) | मतमोजणीसाठी ठरविलेल्या जागी प्रवेश देणे |
| १०. | नियम ६६ | विहित नमुन्यातील जाहीर निकालाच्या प्रती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडून प्राप्त झाल्यावर त्या राज्य निवडणूक आयोगास पाठविणे. |